झुंजार नेता
शुक्रवार दि. १६ ऑक्टोबर २०२० R.N.I.NO.16856 /68\, Postal No - L/29/RNP/ B

# धोंडे महाविद्यालयात हात धुवा व वाचन प्रेरणा दिन साजरा



कडा ( वार्ताहर ):- कडा येथील आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालय अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने प्राचार्य डॉ.हरिदास विधाते यांच्या अध्यक्षतेखाली वाचन प्रेरणा दिन, अंध दिन व जागतिक हात धुवा दिन संपन्न झाला.

यावाबत अधिक माहिती अशी की, भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेची पुजा डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्राचार्य डॉ हरिदास विधाते यांच्या हस्ते करण्यात आली. उपस्थितांना कोविड-१९ शपथ देण्यात आली. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना कलाम यांनी देशासाठी केलेले महान कार्य या विषयी बोलताना त्यांच्या जीवनपटावर प्रकाश टाकुन विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व पटवून दिले. जागतीक अंध दिनाचे महत्त्व जाणून अंध कलाकार सिकंदर मोमीन व सौ.मोमीन यांचा यथोचित सन्मान पूर्वक सत्कार करण्यात आला. या वेळी दैनंदिनी प्रमाणे स्वयंसेवक, विद्यार्थी, विद्यार्थीनी यांचे तापमान तपासून सनिटाईज करण्यात आले होते.तसेच सामाजिक अंतर ठेऊन या कार्यक्रम झाला. या प्रसंगी रा.से.यो.चे स्वयंसेवक, कार्यक्रम अधिकारी, इतर सहकारी प्राध्यापक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.रघुनाथ विधाते यांनी केले व सर्वांना कोविड-१९ ची शपथ दिली. या प्रसंगी उपस्थितांचे अभार कार्यक्रम अधिकारी प्रो.भास्कर चव्हाण यांनी मानले.

Programme Officer
N.S.S. Unit A. D. Mahavidyalaya
Kada, Tal. Ashti, Dist. Beed.

# झुंजार नेता

शुक्रवार दि. २७ नोव्हेंबर २०२० R.N.I.NO.16856 /68\, Postal No - L/29/RNP/


## भारतीय राज्यघटना जगात सर्वश्रेष्ठ-प्राचार्य डॉ. विधाते



कडा ( वार्ताहर ):- भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तयार केलेली राज्यघटना जगात सर्वश्रेष्ठ आहे असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य व प्राचार्य डॉ. हरिदास विधाते यांनी कडा येथे केले.

कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयात संविधान दिन संपन्न झाला. याप्रसंगी डॉ. हरिदास विधाते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलत होते. संविधान दिनानिमित्त प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व संविधान या दोन प्रतिमांची पुजा करुन अभिवादन करण्यात आले.

पुढे बोलताना डॉ. हरिदास विधाते यांनी सांगितले की संविधानाचे महत्त्व सर्वांना किती मोलाचे आहे याचे विवेचन करताना ४ नोव्हेंबर १९४८ ते २६ नोव्हेंबर १९४९ पर्यंतचा घटनाक्रम नमूद करुन डॉ. बाबासाहेबांच्या महान कार्याला शतशः सलाम केला. तसेच २६/११ मुंबई दहशतवादी हल्ल्यातील शहिदांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. यावेळी भारतीय जनता पक्षाचे जिल्हा सचिव शंकर देशमुख, उपप्राचार्य प्रा. भगवान वाघुले एन.एस.एस .कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. भास्कर चव्हाण, प्रा. डॉ. रघुनाथ विधाते उपस्थित होते. याप्रसंगी संविधान उद्देशिकेचे वाचन केले. प्रा. डॉ. भास्कर चव्हाण यांनी प्रस्तावना केली कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. रघुनाथ विधाते यांनी संविधान उद्देशिकेचे वाचन केले. उपस्थितांचे आभार डॉ. शैलजा कुलेकर यांनी मानले. याप्रसंगी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व रा.से.यो. चे स्वयंसेवक उपस्थित होते.

# झुंजार नेता

शनिवार दि.१६ जानेवारी २०२१ | R.N.I.NO.16856 /68\, Postal No - L/29/RNP/

## धोंडे महाविद्यालयात विद्यापीठ नामविस्तार व भूगोल दिन उत्साहात साजरा

कडा ,दि.१५( **प्रतिनिधी** );- कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयात विद्यापीठात नामविस्तार दिन साजरा करण्यात आला . कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विद्यापीठ व्यवस्थापन **परिषद सदस्य** प्राचार्य डॉ . हरिदास विधाते व प्रमुख पाहुणे म्हणुन कडा सरपंच अनिल ढोबळे,ठकाराम दुधावडे, सुभाष भादवे, उपप्राचार्य .डॉ .वाघुले बी. एम. हे उपस्थित होते.

प्रारंभी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे अध्यक्ष व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते पुजन करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी विद्यापीठ नामविस्तार दिनाचे महत्व सांगून



बाबासाहेबांचे शिक्षणा विषयाचे विचार व पिपल्स एजुकेशन सोसायटीची स्थापना किती प्रेरणादायी होती याविषयी प्रा.डॉ भास्कर चव्हाण यांनी सांगितले.

प्रमुख पाहुणे सरपंच अनिल ढोबळे, ठकाराम दुधावडे, सुभाष भादवे यांनी समयोचिय विचार माडले. प्राचार्य डॉ .हरिदास विधाते यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महान कार्याचा आढावा घेऊन आज हे विद्यापीठ वेगवेगळ्या क्षेत्रात प्रगती पथावर असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावामुळे ख-या अर्थाने विद्यापीठाला गौरव प्राप्त झाला आहे असे सांगून समाजातील तळागाळाशी शिक्षण पोहचले तरच समाजप्रगती करु शकतो हे डॉ.आंबेडकरांच्या विचारांची बांधिलकी जपत विद्यापीठ मार्गक्रमण करत आहे. या विद्यापीठात काम करण्याचे भाग्य मला मिळाले आहे. तेंव्हा आपण सर्वांनी चांगले काम करून त्यांच्या विचार व कार्यांची प्रेरणा घेऊन भविष्याची वाटचाल करावी असा आशावाद व्यक्त केला. तसेच भूगोल दिनाचे महत्त्व सांगताना पृथ्वीच्या परीवलना विषयीचे विज्ञान या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. या प्रसंगी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

झुंजार नेता

मंगळवार दि.९ फेब्रुवारी २०२१ R.N.I.NO.16856 /68\, Postal No - L/117/RNP

# राष्ट्रीय रस्ता सुरक्षा सप्ताह साजरा



कडा (प्रतिनिधी ):- कडा येथील आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वत्तीने राष्ट्रीय रस्ता सुरक्षा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.

रस्ता सुरक्षा सप्ताहाचे उदघाटन रस्ता सुरक्षाच्या नियमांचे फलक व घोषणाने कडा शहरात रस्ता सुरक्षा जनजागृती रॅली काढण्यात आली होती . उपप्राचार्य डॉ .बी.एम.वाघुले यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम संपन्न झाला . तसेच या विषयी दि.६/२/२०२१ रोजी विद्यापीठ व्यवस्थापन परीषद सदस्य व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.हरिदास विधाते यांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख पाहुणे पुणे येथील स्वराज इंजिनिअरींग कॉलेजचे प्राचार्य डॉ.पवार यांचे रस्ता सुरक्षा एक सामाजिक जबाबदारी या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यामध्ये विविध मान्यवरांनी अपघाताचे दुष्परिणाम सांगुन सर्वांनी अपघात टाळावेत यासाठी आपण सर्वांनी रस्ता सुरक्षेच्या नियमांचे काटेकोर पालन करावे अशी अपेक्षा प्राचार्य डॉ .विधाते यांनी व्यक्त केली. या कार्यक्रमाचे व रॅलीचे संचलन कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.बी.एम.चव्हाण, प्रा . डॉ. आर. जी. विधाते, प्रा. डॉ. एस .बी. कुमेकर यांनी केले . या कार्यक्रमास सर्व प्राध्यापक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते

Programme Officer
N. S. S. Unit A. D. Mahavidyalaya
Kada, Tal. Ashti, Dist. Beed

# झुंजार नेता

शुक्रवार दि.१२ मार्च २०२१ R.N.I.NO.16856 /68\, Postal No - L/117/RN


## आनंदराव धोंडे महाविद्यालयात जागतिक महिला दिन कार्यक्रम संपन्न



कडा, दि.११ (प्रतिनिधी ):- कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग, महिला सबलीकरण समिती आणि आय. क्यू. ए. सी. यांच्या संयुक्त विद्यमाने महिला दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कोविडच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे हा कार्यक्रम ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आला.

अध्यक्षस्थानी डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य आणि प्राचार्य. डॉ. एच. जी. विधाते होते. प्रमुख पाहुणे म्हणून विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कुशल संचालक प्रा. टी. आर. पाटील उपस्थित होते. प्रमुख वक्तृया भळगट हास्पिटलच्या संचालिका डॉ. सौ. कविता भळगट आणि ओयासिस स्पोकन इंग्लिशच्या संचालिका सौ. सफा सय्यद मॅडम या उपस्थित होत्या.कार्यक्रमाची सुरुवात महिला दिन भित्तीपत्रकाच्या अनावरणाने झाली. पंधराव्या शतकापासून एकोणिसाव्या शतकापर्यंतच्या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांच्या छायाचित्रांचा समावेश असणाऱ्या या भित्तीपत्रकाचे अनावरण ओमशांती अध्यासन केंद्राच्या सुशीला बहेनजी आणि सुनिता बहेनजी यांच्या हस्ते करण्यात आले.

प्राचार्य एच. जी. विधाते यांनी महिलांचे समाजाच्या जडणघडणीत असलेले मोलाचे कार्य विषद करताना राजमाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्यापासून अलिकडच्याच कल्पना चावला सारख्या यशस्वी महिलांच्या कार्यावर विशेष प्रकाश टाकत महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक टी. आर. पाटील यांनी महिलांचे सामाजिक योगदान पूर्वापार चालत आलेले असून आजही राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत महिला कार्यक्रम अधिकारी आणि स्वयंसेविकांच्या माध्यमातून हे योगदान देणे कायम आहे, असे नमूद केले. डॉ. कविता भळगट यांनी महिलांनी आजच्या धावपळीच्या युगात आपल्या कुटुंबाबरोबरच स्वतःच्या आरोग्याची काळजी कशी घ्यावी याबद्दल मार्गदर्शन केले. सौ. सफा सय्यद मॅडमनी विविध कौशल्ये जोपासून महिलांनी व्यक्तीमत्व विकास घडवून आणला पाहिजे असे सांगत महिलांचा व्यक्तीमत्व विकास आणि समाज याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सुमन खेडकर यांनी, पाहुण्यांचा परिचय प्रा. प्रमिला घुमरे यांनी तर सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. शैलजा कुवेकर यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रा. मंगल टेकाडे यांनी मानले. याकार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रो. भास्कर चव्हाण, डॉ. आर. जी. विधाते, महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी तसेच स्वयंसेवक आणि स्वयंसेविका गुगल मीट या प्लॅटफार्मच्या माध्यमातून उपस्थित होते.

Programme Officer
N. S. S. Unit A. D. Mahavidyalaya
Kada, Tal. Ashti, Dist. Beed.

पुण्य नगरी

रघुनाथ कर्डीले, आष्टी तालुका प्रतिनिधी

पुण्यनगरी

# त्या वळण रस्त्यावर बॅरिकेट्स लावून तात्पुरत्या स्वरूपात केली मलमपट्टी

## तात्काळ उड्डाणपूल करा : पाच गावांतील नागरिकांची मागणी

आष्टी / प्रतिनिधी : बारामती - औरंगाबाद राज्यमार्गावर कडा येथे नगर बीड रेल्वेमुळे तयार केलेल्या काटकोनातील वळण रस्त्यामुळे एका महिन्यात तब्बल ५० हुन अधिक जण जखमी झाले आहेत. यावर माध्यमांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनी आवाज उठवताच सोलापूर येथील रेल्वे विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली व बुधवारी या वळण रस्त्यावर तात्पुरत्या स्वरूपात बॅरिकेट्स लावले आहेत परंतु या ठिकाणी उड्डाणपूल होणे अत्यंत गरजेचे आहे.

नगर बीड परळी रेल्वे मार्गाचे काम जलद गतीने सुरू झाले असून कडा येथील बारामती औरंगाबाद या रस्त्यावर तब्बल दीड किलोमीटरचा वळण रस्ता तयार केला आहे शिवाय हा रस्ता तयार करताना अगदी जागेवर वळण व काटकोनात रस्ता तयार केल्याने या ठिकाणी एका महिनाभरात पन्नास पेक्षा अधिक अपघात झाले असून यामध्ये अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत यावर कडा येथील पत्रकारांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनी आवाज उठवताच सोमवारी सोलापूर येथील रेल्वे विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी भेटी दिल्या त्या वेळी त्यांना ही हे वळण धोक्याचेच आहे हे लक्षात आले त्यानंतर आज बुधवारी तात्काळ या ठिकाणी अपघात टाळण्यासाठी बॅरिकेट्स लावून मलम पट्टी तयार करण्यात आली आहे मात्र बॅरिकेट्स लावून कायमस्वरूपी हा प्रश्न संपणार नाही तर यासाठी या ठिकाणी उड्डाणपूल तात्काळ करावा अशी मागणी कडा, लिंबोडी देविनिमगाव, धामणगाव, खिळद, गितेवाडी धादेगाव या भागातील नागरिकांनी केली आहे.



## धोंडे महाविद्यालयाची सामाजिक बांधिलकी

कड्यातील रेल्वे क्रॉसिंगवर त्या वळणावर अनेक ठिकाणी अपघात झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. हरिदास विधाते, उपप्राचार्य प्रो.डॉ. भगवान वायुळे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रो. भास्कर चव्हाण, डॉ. रघुनाथ विधाते, डॉ. विजय पोकळे, डॉ. दिलीप बोराडे, डॉ. महेमुद पटेल, डॉ. सांडू भगत, प्रा. किरण कटके, डॉ. रवि गाजुरे, डॉ. सज्जन गायकवाड, डॉ. राम बोडखे डॉ. दत्तात्रय केंडखे, डॉ. दत्ता नरसाळे, डॉ. भिमराज बावडे, डॉ. सम्भाजी ओव्हळ, प्रा.डॉ. प्रमिला घुमरे, डॉ. सुमन खेडकर, डॉ. शैलजा कुचेकर, पोपट लगड, अनिल खेडके सह इतर सहकारी यांनी या पुढे दुर्घटना होऊ नये यासाठी सामाजिक बांधीलकीतून त्या वळण रस्त्यावर दगड ठेवून त्यावर पांढरा चुना टाकून अपघात रोखण्यासाठी मदत केली.

# झुंजार नेता

गुरुवार दि.२९ ऑक्टोबर २०२० R.N.I.NO.16856 /68\, Postal No - L/29/RNP/


## धोंडे महाविद्यालयात दक्षता जनजागृती सप्ताह साजरा



कडा ( वार्ताहर ):- कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयात दक्षता जनजागृती सप्ताह कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ हरिदास विधाते होते.

राज्यपाल कोशीयारी यांच्या आव्हानाला प्रतिसाद देत कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने दक्षता जनजागृती सप्ताहनिमित्त संदेशाचे वाचन प्राचार्य डॉ हरिदास विधाते यांनी केले. दक्षता जनजागृती सप्ताह अंतर्गत सर्वांना भ्रष्टाचार निर्मलनाची शपथ देण्यात आली. याप्रसंगी उपप्राचार्य भगवान वाघुले, गांधी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. अशोक कोरडे, प्रा. डॉ.अनिल गर्जे , रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. भास्कर चव्हाण, प्रा. डॉ. रघुनाथ विधाते, प्रा. डॉ. शैलजा कुमेकर यांचेसह प्राध्यापक व कर्मचारी आणि राष्टीय सेवा योजना स्वयंसेवक उपस्थित होते.

Programme Officer
N. S. S. Unit A. D. Mahavidyalaya
Kada, Tal. Ashti, Dist. Beed.